ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 1.9152(UIF) VOLUME - 4 | ISSUE - 10 | JUNE - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जलविषयक धोरण आणि आजची वास्तविक्ता

**प्रा. डी. बी. ताडेराव**
**इतिहास विभाग प्रमुख , कला आणि वाणिज्य महाविद्यालय,**
**फोंडाघाट जि. सिंधुदुर्ग.**

## प्रस्तावणाः–



आधुनिक भारताच्या जडणघडणीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान हे अनन्य साधारण स्वरुपाचे आहे.कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य हे केवळ एका विशिष्ट क्षेत्रापुरते मर्यादित नव्हते तर त्यांचे योगदान हे देशाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी अनेक क्षेत्रात सर्वोच्च व मार्गदर्शक होते हे आज सिध्द झालेले आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर केवळ एक व्यक्ति नसून तो एक विचार आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची व्यासंगता, विव्दता आणि त्यांनी दुरदृष्टिने घेतलेले निर्णय आज संपुर्ण जगात अभिमानाचा विषय बनलेला आहे. परंतू आज देशाला स्वातंत्र्य मिळून अनेक वर्ष झाली तरीही अनेक गंभीर समस्या दिवसेंदिवस वाढतानां दिसून येतात. बेकारी, उपासमार, कुपोषण, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, पाण्यासाठी भटकंती, विविध राज्यात, जिल्हयात जलयुध्दाची परिस्थिती या व अशा अनेक गंभीर समस्या दिवसेंदिवस वाढतानां दिसून येतात. त्यामुळे या सर्व समस्येकडे गांभिर्याने पाहण्याची वेळ आली आहे. कारण आजच्या काळात देशात शेती आणि पाणी प्रश्न अत्यंत गंभिर विषय आहे. कमी झालेले पावसाचे प्रमाण, अवकाळी पाऊस, पाण्याच्या साठवणूकी व वापरा संदर्भातील अज्ञान यामुळे पाणी प्रश्नाने अधिक उग्ररुप धारण केलेले आहे. यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राबविलेल्या जलविषयक धोरणाचा आराखडा अभ्यासून त्याची केंद्राच्या धर्तीवर संपूर्ण राज्यात अमलबजावनी केल्यास देशातील जलप्रश्न कायमचा निकाली लागून देश सर्वोच्च स्थानी पोहचण्यास वेळ लागणार नाही.

ब्रिटिश काळात १९४२ ते १९४६ या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताचे मजूर मंत्री होते. यावेळी त्यांच्याकडे बांधकाम, उर्जा व पाटबंधारे या महत्त्वपूर्ण खात्याचाही पदभार होता.[१] यावेळी त्यांनी जलविषयक धोरणाचा सखोल अभ्यास करुन एक दिर्घकालीन धोरण ठरविले होते. त्यामध्ये जलसंपतीच्या विकासासाठी नदी खोऱ्याचां बहुउद्देशिय विकास व्हावा, जल ही संपती असल्याने तिचे वितरण योग्य पध्दतीने झाले पाहीजे. नदी आणि किनारे यांचा बंदोबस्त करुन पुराचा धोका टाळण्याचा प्रयत्न व्हावा, पाण्याचे जतन करुन त्याचा पुनर्वापर व्हावा, मोठमोठी धरणे बांधून त्यामध्ये पाणी साठवावे. अशा प्रकारचा आराखडा त्यांनी तयार करुन दिला होता. परंतू दुदैवाने त्यावेळी त्याची म्हणावी तेवढी अमलबजावनी होऊ शकली नाही. परंतू स्वातंत्र्यापूर्वी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जी जलविषयक व विद्युत प्रकल्पाची जी योजना मांडली होती. त्या योजनेच्या आराखडयानूसार भारतात दामोदर खोरे प्रकल्प, हिराकुंड धरण प्रकल्प व सोन नदी प्रकल्प उभारण्यात आले आहेत या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारताच्या जल व विद्युत निर्मितीचे प्रणेते ठरतात.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ३ जानेवारी १९४४ रोजी झालेल्या कलकत्ता येथील परिषदेत आपले विचार मांडले त्या विचारात त्यांनी भारतातील जंगले आणि नदया केंद्र सरकारच्या अखत्यारीत आणल्यास पूरनियंत्रक आणि जमिन संधारण समस्यावर उपाय करता येतील. दामोदर नदीवर धरण बांधल्याने पूरनियंत्रन, वीज उत्पादन तसेच शेतीला पाणी ही उद्दिष्टे साध्य होतील. आपल्या जलमार्ग धोरणाचा उद्देश केवळ पाटबंधारे आहे. रेल्वेला ज्याप्रमाणे प्रांतिय सीमा नाहीत तशाच जलमार्गालाही असू नयेत परंतू या दोघात फरक केल्याने रेल्वेला केद्रिंय तर जलमार्गाला प्रांतीय मानले आहे. या विचारातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जलविषयक धोरणाचा हेतू केवळ महापूर थांबविणे एवढाच नसून त्यामध्ये विद्युत निर्मिती, सिंचनासाठी पाणी पुरवठा, जलवाहतूक आणि औद्योगिक वापरासाठी पाणी यांचाही समावेश होतो. या धोरणात्मक निवेदनानुसार अंतर्गत जलमार्गाच्या विकासासाठी पुढील बाबीचा समावेश होता. १) नदीतील आणि अस्तित्वातील इतर जलमार्गातील नौकानयन सुधारण्यासाठी उपाययोजना करणे. २) सिंचन कालव्याचा वापर शक्य तेथे अंतर्गत जलवाहतूकीसाठी करणे. ३) नवीन कृत्रिम जलमार्गाची निर्मिती करणे. ४) आगबोट, हाताने वल्हवण्याच्या नौका आणि शक्ति साधनांवर चालणाऱ्या मोठया जहाजाचा वापर

वाढविणे ५) देशातील गलबतांचा विकास करणे. ६) इतर वाहतूक साधनामध्ये स्पर्धा उत्पन्न करणे आणि आवश्यक तेथे सर्व प्रकारच्या वाहतूक साधनमध्ये समन्वय प्रस्थापित करणे, आंतरराज्य प्रकल्पाबाबतीत अमलबजावनीसाठी त्यांनी एका स्वतंत्र्य प्राधिकरणाची आवश्यक्ता सुचविली आणि त्यानुसार संबधित प्रांत/राज्य आणि केंद्र यांच्यातील करारानुसार त्यांचे अधिकार निर्माण करण्याची त्यात तरतुद केली. ही माहिती डिसेंबर १९४४ रोजी सर्व प्रांताना पाटविलेल्या पत्रात स्पष्ट केलेली होती.त्यानुसार आंतरराज्यीय नद्याच्या समस्या लक्षात घेता खालील बाबीचा समावेश प्राधिकरणात केला.[२]

१) आंतरराज्यीय नदी आणि तिच्या उपनद्यातील पाण्याचे अधिकार प्राप्त राज्याने प्राधिकरणाला देणे २) तांधिकरणात येत असलेल्या क्षेत्रात प्राधिकरणाला विद्युम निर्मितीसाठी आवश्यक सर्व अधिकार प्रांत आणि राज्य यांना देण्यासाठी सहमती दर्शविणे. ३) प्राधिकरणाच्या मंजूरी शिवाय कोणतेही प्रांत आणि राज्य नदीतील पाणी कोणत्याही परिस्थितीत काढून घेणार नाही अथवा वापरणार नाही ४) धरणाची निर्मिती केल्यामुळे त्याच्या आजुबाजुची जमीन पाण्याखाली जाणार त्याची व्यवस्था करण्याचे आणि त्यांच्याशी सहमती दाखविण्याचे काम प्रांत आणि राज्यानी करावे. त्यानुसार १९४८ मधील संसदीय लोकसभेने कायदा करुन कायदेशीर समर्थन दिल्याने दामोदर खोऱ्याच्या विकासासाठी निमस्वायत महामंडळाची स्थापना झाली. अशा तऱ्हेने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जल-विद्युत धोरणाचे फलीत म्हणो दामोदर खोरे प्रकल्प, हिराकुंड धरण प्रकल्प व सोन नदी प्रकल्प होय.[३]

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जलविषयक धोरणामागे स्वतंत्र्य अशी भूमिका होती. त्यांच्या या कार्यात महत्त्वाचे कार्य म्हणजे बिहार व बंगाल या दोन राज्याना जोडणाऱ्या दामोदर नदीचे विपरीत रुप पाहुन या नदीवर धरण बांधण्याचा धाडसी निर्णय त्यांनी घेतला कारण ही नदी बिहार मध्ये जमिनीची झीज करते तर प.बंगाल मध्ये पुराने थैमान घालते. त्यामुळे या नैसर्गिक आपत्तीचा सामना करण्यासाठी या नदीचे पाणी नियंत्रित करुन शेतीचा विकास करण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अहोरात्र कष्ट घेतले व दामोदर प्रकल्पाची निर्मिती केली. त्यानंतर त्यांनी ओरीसातील महानदीवर हिराकुंड धरण बांधून ओरीसातील जनतेला महानदीच्या पुरापासून संरक्षण दिले. या बरोबरच त्यांनी १९४५ च्या दरम्यान मध्यप्रदेशात वाहत जाऊन गंगेला मिळणाऱ्या सोननदीवर बहुउद्देशीय प्रकल्प उभा केला व देशाला पाणीदार करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी नदीजोड प्रकल्पासाठी केलेले काम त्यांनी घेतलेले धाडसी निर्णय आणि अत्यंत विचारपूर्वक सोडवलेले पुनर्वसनाचे प्रश्न या बाबी देशाच्या जलविषयक धोरणात अग्रभागी आहेत कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जल व विद्युत धोरणामागे स्वतंत्र्य अशी भूमिका होती. त्यांच्या मते राज्या-राज्यातून जाणारे रेल्वेमार्ग आणि जलमार्ग यात फरक नसतो परंतू तो फरक केल्यामुळे रेल्वेला आपण केंद्रिय आणि उर्जेला प्रांतीय समजू लागतो. त्यामुळे देशाच्या जल व उर्जा धोरणात केंद्राचे अधिकार वाढले नाही तर राज्या-राज्यात पाण्याच्या वाटपावरुन वाद तर होतीलच परंतू विजनिर्मितीच्या प्रक्रियेत मोठे अडथळे येतील. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेले हे धोके आज आपण अनुभवतो आहोतच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जल आणि विद्युत विकासाच्या कार्यामध्ये देशाच्या आर्थिक विकासाचे सुत्र होते. कारण त्यांच्या मते भारतीय लोक दारिद्रयाच्या दृष्टचक्रात कायमचे अडकलेले आहेत. त्यामुळे त्यांना दारिद्रयातून सोडवण्याचा मार्ग म्हणजे औद्योगिकीकरण आहे.[४] औद्योगिकीकरणासाठी विजेची नितांत गरज आहे. मुबलक विजेची निर्मिती करण्यासाठी योग्य जलनियोजन करणे महत्तवाचे आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अत्यंत धोरणीपणाने एकाच वेळी खेडी आणि शहराच्या विकासाचे स्वप्न पाहीले होते. परंतू आज या दोन्ही जिवनावश्यक गोष्टीवरुन केंद्र विरुध्द राज्य, राज्य विरुध्द जिल्हे, जिल्हे विरुध्द तालुके, तालुके विरुध्द गाव आणि गाव विरुध्द दुसरे गाव ज्या तऱ्हेने एकमेकाशी भांडत आहेत ती भांडणे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित नव्हतीच उलट त्यांनी सविधानात अनेक गोष्टीच्या तरतुदी करुन ठेवल्या त्यामुळे संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी उर्जा आणि पाण्याचा प्रश्न कसा सोडविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जलविषयक धोरणातून दिलेले योगदान समजून घेणे काळाची गरज आहे.

## निष्कर्ष

१. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलविषयक धोरण हे केवळ तत्कालीन कारणासाठी नाही तर त्यांचे धोरण भविष्याचा वेध घेणारे दिर्घकालीन धोरण आहे. त्यांच्या धोरणातून देशातील तळागाळातील लोकांचा आर्थिक विकास साधने व त्यांना सक्षम बनविणे व देशाचा सर्वांगिण विकास साधने ही त्यांच्या जलविषयक धोरणाची दृष्टी होती.

२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राबविलेल्या जल विषयक धोरणाचा, नियोजनाचा स्विकार केला आणि ते धोरण केंद्राच्या धर्तीवर विविध राज्यात राबवून त्याची योग्य अमलबजावणी केल्यास देशात बरेच सकारात्मक बदल दिसून येणार आहेत व देशातील पाणी प्रश्न, शेतकरी आत्महत्या यासारख्या अनेक समस्यावर मात करुन देश समृध्द बनवण्यास हातभार लागेल कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जलविषयक धोरणात वैज्ञानिक दृष्टिकोनावर भर देऊन चारमाही नद्यांना जोडून नदीजोड प्रकल्पावर भर दिलेला दिसून येतो.

**संदर्भग्रंथ सूची**

१. मून वसंत व हरी नरके (संपा.) २००२ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, खंड १८ वा, भाग ४,डॉ.बाबासाहेब आंबेडकर चरित्र प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन मुंबई,

२. थोरात सुखदेव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर नियोजन,जल व विद्युत विकास भूमिका व योगदान, सुगावा प्रकाशन,पुणे,प्रथमावृती,२००५

३.गुंजकर सोमनाथ व कापसे शिवसांब (संपा), डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचारधन आणि दृष्टिकोन, अनुराधा प्रकाशन, नांदेड,प्रथमावृती २०१७

४. हनवते प्रकाश व डॉ.हनवते उत्तम (संपा),डॉ.बाबासाहेब आंबेडकर काल,आज आणि उद्या निसर्ग प्रकाशन,हिंगोली, (११ जुलै २०१६)